**Report of Canteen**

**Yeshwant Mahavidyalaya Nanded**

**2023**

Yeshwant Mahavidyalaya, Nanded has a spacious canteen on its campus. The college is providing canteen facility to the students as well as teaching and non-teaching staff of the college; it is capable of catering the demands of the students and can accommodate 25 persons at a time. It has spacious & properly maintained room as well as kitchen; generally the college provides it to any individual on contract basis after proper official's formalities

The College canteen also caters to the functions organized in the college programmes like seminars, conferences and workshops.

Kitchen staff takes care to provide the students and staff a nutritious and hygienic food at our campus canteens. A variety of hygienic food and snack items includes South and North Indian Meals, Variety Rice's Chinese Foods Fresh Juices, etc. In this canteen there is a good arrangement of about 30 food items for breakfast and lunch. There is a separate arrangement for students and staff and cleanliness is maintained. The canteen remains open on all working days. It provides all types of nutritious and hygienic eatables and beverages to cater to the students, staff and visitors.

Mrs.Kiran Vijay Yashwantker runs this canteen.

Documents and agreement of canteen :

યશવંત મહાવિદ્યાલય ઉપહારગૃહ [illegible]
ખાદ્યપદાર્થ દર ખાલીલ પ્રમાણે આહેત

(1)
દિ 03-04-2023

1) ચા — 06 ✓
2) ચા કડક — 10 ✓
3) કોફી — (12) 10
4) ઈડલી — (30) 25
5) વડાસાંભાર — 35 ✓
6) મસાલા ડોસા — 30 ✓
7) મિસળ વડા — 35 ✓
8) ઉત્તપા — 30 ✓
9) પોહા — (20) 15
10) ઉપમા — (25) 20
11) વડાપાવ — 10 ✓
12) પાવ વડા — (20) 15
13) પાવ ભાજી — 30 ✓
14) મિસળ પાવ — 30 ✓
15) પુરી ભાજી — 25 ✓
16) સેન્ડ-વેજ — 40 ✓
17) સમોસા — (15) 10
18) કચોરી — (15) 10
19) ખીચડી — 20 ✓
20) સાબુદાણા ખીચડી — 25 ✓
21)

B.M. Kamble
S.M. Telang
V.P. Thakur
L.G. Jadhav

Permitted
3-4-23
Kavita Sonkamble

[signature]

Shri Sharda Bhavan Education Society's

# YESHWANT MAHAVIDYALAYA, NANDED-431602 (M.S.)

(Affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

**NAAC Reaccredited "A" Grade (III[rd] Cycle)**

'COLLEGE WITH POTENTIAL FOR EXCELLENCE STATUS'

UG-Arts, Science, Commerce, B.Sc.(C.S.), B.Sc.(B.T.), PG-Economics, History, English, Sociology, M.Com., Chemistry, Zoology, Environmental Science, Microbiology, Computer Science, Dairy Science, MCM, Information Technology, Biotechnology, Electronics, Botany, PG Diploma in Tax Procedure & Practice, PG Diploma in Electronics/Embedded System Design. Research Center in Biotechnology, Botany & Horticulture, Chemistry, Commerce, Computer Science & Information Technology, Dairy Science, Economics, Electronics, English, Environmental Science, Hindi, History, Marathi, Mathematics & Statistics, Microbiology, Political Science, Physics, Urdu & Zoology)

**Establishment Year: 1963**

| Hon'ble Shri Ashokrao Chavan | Shri D.P.Savant | Dr.Ganeshchandra N. Shinde |
|---|---|---|
| President | Secretary | Principal |

Phone No.s:- (02462) 254170, 254487(Office), 253726(Fax)

website: www.ymnnanded.in  Email: principalymn@gmail.com

Ref.No.: 2023-2024/  Date:01.04.2023

## सूचना

महाविद्यालयातील कॅन्टीनचे नविन दर ठरविण्यासाठी खालील प्रमाणे खालील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्यासंदर्भात दिनांक 03.04.2023 रोजी सकाळी 11.00 वाजता उपप्राचार्य यांच्या कक्षात बैठक आयोजीत करण्यात आली आहे.

तरी, खालील समितीने कॅन्टीनचे नविन दरपत्रक निश्चित करुन त्याचा अहवाल सादर करावा.

PRINCIPAL
Yeshwant Mahavidyalaya
NANDED

1. डॉ. के.जी.सोनकांबळे — अध्यक्ष
2. डॉ. एस.सी.धोकडे — सदस्य
3. डॉ. बी.एम.कांबळे — सदस्य
4. डॉ. एस.एम.तेलंग — सदस्य
5. श्री व्हि.पी.ठाकुर — सदस्य
6. श्री आर.जी. जाधव — सदस्य

॥ श्री ॥

(2)

3/4/23.

21) પકોડા (સર્વ પ્રકારચે) — 25 ✓

22) સાબુદાણા વડા — ~~30~~ 25

23) ડ્રાય મન્ચુરીયન — 35 ✓

24) ઢોકળા — 20 ✓

25) ખુડવડા — 35 ✓

26) મેગી — ~~40~~ 30

) શેઝવાન રાઈસ — 40 ✓

) બ્રેડ પકોડા — 15 ✓

) રાઈસ પ્લેટ — 80/- ✓

~~[illegible]~~ — ~~[illegible]~~

) Ice-cream — MRP. ✓

Permitted

3-4-23

B. M. Kamble

S. M. Telang

Kavita Sonkamble

V P Thakur

R. G. Jadhav

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये  Rs. 100

रु. 100  ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA  ● 2022 ●  32AA 458948

जोडपत्र-१

मुद्रांक विक्री नोंद क्र. 2026 दिनांक 31/1/2023

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव : किरण विजय यशवंतकर

मुद्रांक घेणाऱ्याची सही : Kiran

मुद्रांक विक्रेत्याची सही

...क्र. 3491032

Treasury Office Nanded
30 JAN 2023
Stamp Head Clerk
NANDED

NOTARY
Adv. Telang C.G.
Nanded
Reg. No. 10350
GOVERNMENT OF INDIA

# करारनामा

लिहुन देणार :— सौ.किरण विजय यशवंतकर,
वय ४८ वर्षे, धंदा — व्यापार,
मे.गिरीराज फाऊंडेशन,
यशवंतनगर,
नांदेड.

लिहुन घेणार :— यशवंत महाविद्यालय, नांदेड
तर्फे प्राचार्य
डॉ.गणेशचंद्र पि.नरहरराव शिंदे,
वय ५७ वर्षे, धंदा नौकरी,
नांदेड

कारणे करारनामा लिहुन देते की,

हे की, लिहुन देणार यांना उपहारगृह चालविण्याचा अनुभव आहे.

Kiran

हे की, लिहुन घेणार यशवंत महाविद्यालय मध्ये हजारो विद्यार्थी शिक्षण घेतात व लिहुन घेणार यांनी महाविद्यालयाच्या आवारामध्ये विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी उपहारगृह चालु करण्याचे ठरविले आहे. लिहुन दे यशवंत महाविद्यालयाच्या आवारामध्ये विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी उपहारगृह चालु करण्याचा प्रस्ताव दिला ज घेणार यांनी मान्य केला आहे व लिहून देणार हे सदरील उपहारगृह दि.१.२.२०२२ पासुन चालु केले आहे. देणार व लिहुन घेणार यांच्यामध्ये ज्या अटी व शर्ती ठरल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे आहेत.

१) हे की, लिहून घेणार यांनी यशवंत महाविद्यालय परिसरात उपहारगृह चाविण्याकरिता खाली वर्णन भाग लिहुन घेणार यांना प्रति महिना रूपये १५,०००/– (अक्षरी रूपये पंधरा हजार फक्त) प्रमाणे उप चाविण्याकरिता किरायाने देण्याचे मान्य केले आहे.

२) सदरचा करारनामा दि.१.२.२०२३ ते ३१.१२.२०२३ या कालावधी करिता राहील. लिहून देणार व घेणार हे आपसी संमतीने सदरची मुदत वाढून देवु–घेवू शकतील व जर लिहून घेणार यांनी मुदत वाढवुन दे ठरविल्या पुढील वर्षाचा किराया प्रति वर्षे १० टक्केने वाढ कदण्याचे ठरले आहे. म्हणजे पुढील वर्षाचा कि प्रतिमाह रू.१६,५००/– एवढा राहील. मुदत वाढ देणे किंवा न देणेचा संपुर्ण अधिकार लिहुन घेणार यांना रा

३) लिहुन देणार यांनी अन्न व भेसळ कायद्या अंतर्गत किंवा इतर जे कांही परवाने लागतात ते काढल्यानंतरच उपहारगृह चालु करण्याचे ठरले आहे.

४) लिहुन देणार यांना भेसळयुक्त तेल अथवा पदार्थ वापरता येणार नाही.

५) लिहुन देणार यांनी उपहारगृहामधील जागेमध्ये व त्यांच्या परिसरात साफसफाई ठेवण्याचे मान्य केले उपहार गृहातील उष्टे किंवा शिल्लक राहिलेले अन्न पदार्थ इत्यादी ताबडतोब महाविद्यालय परिसराच्या बाहेर नष्ट करण्याचे ठरले आहे. त्या परिसरामध्ये दुर्गंधी येणार नाही याची पूर्ण खबरदारी लिहुन देणार यांच्यावर रा

६) लिहुन देणार हे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या व्यतिरिक्त इतर बाहेरील व्यक्तिंना गृहामध्ये प्रवेश देणार नाहीत व त्यांना खाण्यापिण्यास पण देणार नाहीत.

७) लिहुन देणार यांनी उच्च श्रेणीची खाद्य पदार्थ तयार करून देण्याचे मान्य केले आहे. त्यामध्ये कांही आढळल्यास किंवा त्याच्यामुळे कोणाला काही त्रास झाल्यास किंवा विषबाधा इत्यादी झाल्यास त्याची जवाबदारी लिहुन देणार यांच्यावर राहील.

८) सदरील लिहुन देणार हे उपहार गृहामध्ये किंवा त्याच्या परिसरामध्ये कोणतेही गैरकायदेशीर कृत्य नाहीत किंवा कोणासही करू देणार नाहीत. तसे काही झाल्यास त्याची संपुर्ण जवाबदारी लिहून देणार यां राहील.

९) लिहुन देणार यांनी लिहनु घेणार यांच्याकडे रू.५०,०००/– (अक्षरी रूपये पन्नास हजार फक्त) डि म्हणुन जमा केली आहे. सदरची रक्कम लिहुन घेणार हे मुदत संपल्यानंतर बिन व्याजी परत करण्याचे मान्य आहे. सदरील रक्कमेतुन देखभाल खर्च किंवा लाईट बिल थकित राहिल्यास कपात करण्याचे ठरले आहे.

१०) सदरील उपहार गृहामध्ये लिहुन घेणार यानी सब लाईट मिटर बसवुन दिले आहे व वापरलेल्या युनिट लाईट बिलाची रक्कम प्रतिमहा देण्याची जवाबदारी लिहुन देणार यांच्यावर राहिल.

११) लिहनु देणार यांनी उपहार गृहासमोरील व बाजुचे जागेवरील बगीच्याचे व रोपटयाचे देखरेख स्वतः कर

१२) लिहुन घेणार यांनी उपहार गृहामध्ये पाण्याचे कनेक्शन दिलेले आहे. पाणी कमी पडल्यास किंवा कोण कारणाने पुरवठा न झाल्यास लिहुन देणार यांनी उपहारगृहासाठी लागणारा पाणी स्वतः उपलब्ध करून घेतील.

१३) खाद्य पदार्थाबाबतची संपुर्ण जवाबदारी लिहुन देणार यांच्यावर राहिल.

१४) उपहार गृह चालविण्याकरिता लिहुन घेणार यांनी किंवा श्री शारदा भवन शिक्षण संस्था किंवा सल्लागार समितीमार्फत वेळोवेळी दिले गेलेले सर्व सुचनांचे व आदेशांचे पालन करण्याची जवाबदारी लिहुन देणार यांच्यावर राहील.

१५) उपहार गृहाच्या ईमारतीची देखभाल लिहुन देणार यांनी करण्याचे ठरले आहे. उपहार गृहाच्या ईमारतीला धोका होईल असे कोणतेही कृत्य लिहुन देणार यांना करता येणार नाही.

१६) उपहार गृह चालविण्याची वेळ कार्यालयीन दिवशीच सुर्योदयापासुन सुर्यास्तापर्यंत असेल. त्यापुर्वी किंवा त्यानंतर उपहार गृहामध्ये लिहुन देणार यांना प्रवेश राहणार नाही. सुट्टीच्या दिवशी उपहार गृह बंद ठेवावे लागेल.

१७) उपहार गृहामध्ये भांडण तंटा वगैरे व तसेच गैर कायदेशिर/बेकायदेशीर कृत्य झाल्यास त्याची संपूर्ण जवाबदारी लिहुन देणार यांच्यावर राहील.

१८) उपहार गृहाचा किराया दर महिन्याच्या ०५ तारखेपुर्वी लिहुन घेणार यांच्याकडे जमा करावे लागेल. किराया सलग दोन महिनेपर्यंत कार्यालयात जमा न केल्यास लिहुन घेणार यांना सदरचा करारनामा रद्द करण्याचा अधिकार राहील.

१९) लिहुन देणार यांनी सदरील करारमान्याच्या कोणत्याही अटी व शर्तीच्या भंग केल्यास किंवा लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांच्या हिताच्या विरूध्द कार्य केल्यास किंवा जन माणसाच्या हिताच्या विरूध्द काम केल्यास लिहुन घेणार यांना ०७ दिवसाची नोटीस देवुन सदरचा करारनामा रद्द करण्याचा अधिकार राहील.

२०) सदरच्या करारनामाच्या मुदत संपल्याबरोबर किंवा मुदतवाढ न मिळाल्यास लिहुन देणार यांनी उपहार गृहामधील आपले संपुर्ण साहित्य काढुन नेण्याचे मान्य केले आहे व तसे न केल्यास लिहुन घेणार यांना उपहार गृहातुन लिहुन देणार यांचा सामान बाहेर काढण्याचा अधिकार राहील व तसे कांही झाल्यास लिहुन देणार यांना सामानाविषयी कोणतेही तक्रार करण्याचा किंवा सामान कमी जास्त झाल्याची तक्रार करता येणार नाही.

२१) लिहुन देणार हे नाबालकास कामावर ठेवणार नाहीत तसेच कामगार कायद्याचा उल्लंघन करणार नाहीत. कामगार कामावर ठेवतांना त्याचे पोलिस पडताळणी करून घेवुनच त्यांना कामावर ठेवतील. तसेच उपहार गृहामध्ये काम करणारे कामगार व कर्मचारी हे कोविडची लस घेतलेला व्यक्ती असावा व त्यांनी शासनाने वेळोवेळी ठरवुन दिलेले एस.ओ.पी.चे पालन करतील. कामगारांची पगार देण्याची संपूर्ण जवाबदारी लिहुन देणार यांच्यावर राहिल. उपहार गृहामध्ये चोरी झाल्यास किंवा उपहार गृहाचा सामान कमी जास्त झाल्यास त्याची संपूर्ण जवाबदारी लिहुन देणार यांचयावरच राहील.

२२) सदरील ईमारतीच्या पहिल्या मजल्यावर जाण्याकरिता पायऱ्या व पोर्च आहे. सदरील पोर्च व पायऱ्यामध्ये लिहुन देणार यांना कसल्याही प्रकारचा सामान ठेवता येणार नाही व अडथळा निर्माण करता येणार नाही. लिहुन देणार यांना किरायाने दिलेल्या भागाच्या बाहेर कोणत्याही प्रकारचा सामान ठेवता येणार नाही.

२३) सदरील ईमारतीमध्ये लिहुन देणार यांना फक्त गॅसच्या शेगडीचा वापर करता येईल त्यामध्ये धुर होईल व ईमारतीस धोका होईल असे कोणतेही कृत्ये करता येणार नाही.

२४) लिहुन देणार यांना उपहार गृह इतर कोणासही चालविण्यास देता येणार नाही तसेच लिहुन देणार यांना उपहार गृहाचा कोणताही भाग कोणत्याही करारनाम्याआधारे कोणालाही देता येणार नाही. त्यामध्ये भाडेकरू अथवा पोट भाडेकरू इत्यादी ठेवता येणार नाही.

२५) उपहार गृहाच्या आवारामध्ये कोणते त्रयस्त व्यक्ती येणार नाहीत व मेसच्या आवारामध्ये मुलींची छेडछाड होणार नाही हे पाहण्याची जवाबदारी लिहुन देणार यांच्यावर राहिल.

## उपहार गृहासाठी दिलेल्या मिळकतीचे वर्णन

नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड यांच्या हद्दीतील यशवंत महाविद्यालय परिसरातील कॉलेज कॅन्टीन (उपहार गृह) या नावाने ओळखली जाणारी इमारतीच्या जमीन मजल्याचा भाग जो सोबत जे नकाशामध्ये लाल रंगाने दाखविलेला भाग आहे. सदरचा नकाशा हा सदरील करारनाम्याचा भाग समजला ज्याची चतु:सिमा:—

पुर्वेस :— मोकळी जागा व त्यानंतर मदनलाल राठी मार्ग

पश्चिमेस :— ओपन स्पेस व खेळाचे मैदान

उत्तरेस :— मोकळी जागा व त्यानंतर महात्मा फुले शाळा

दक्षिणेस :— मोकळी जागा व यशवंत कनिष्ठ महाविद्यालयाची इमारत

करिता हा करारनामा लिहुन दिला जो खरा असुन मला मान्य आहे.

दिनांक :— ३१.१.२०२३.

स्थळ :— नांदेड

लिहुन देणार

साक्षीदार:—

१) Sandeep Gadhl Registrar

२) K.J. Biradar (O.S.)

सौ.किरण विजय यशवंतकर,
वय ४८ वर्षे, धंदा — व्यापार,
मे.गिरीराज फाऊंडेशन,
यशवंतनगर, नांदेड.

लिहुन घेणार
यशवंत महाविद्यालय, नांदेड
तर्फे प्राचार्य
डॉ.गणेशचंद्र पि.नरहरराव शिंदे,
वय ५७ वर्षे, धंदा नौकरी,
नांदेड.

8 FEB 2023

NOTARY GOVERNMENT OF INDIA Adv. Telang G.G. Dist. Nanded Reg. No. 10350

"BEFORE ME" TELANG G.G.

Some pictures:




यशवंत महाविद्यालय, उपहारगृह.



